


यशवंतराव गडाख लिखित 'अंतर्वेध' पुस्तकाचे प्रकाशन करताना केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव, ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील. समवेत आ. चंद्रशेखर घुले, शारदाताई गडाख, यशवंतराव गडाख, पालकमंत्री बबनराव पाचपुते, प्रकाशक अरुण शेवते, द. ता. भोसले आदी. ( छाया- किरण दरंदले, सोनई)

२८ एप्रिल २०१२

# गावगाड्यातील बदलाचा संवेदनाशील 'अंतर्वेध'

## डॉ. जाधव यांचे मत; यशवंतराव गडाख यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

> 'अंतर्वेध'च्या निमित्ताने यशवंतराव गडाख यांच्या अनुभवसमृद्ध लेखणीतून गावगाड्याचे मनस्वी चिंतन समाजासमोर आले आहे.
>
> – डॉ. नरेंद्र जाधव, केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य

सोनई, ता. २८ : "गावगाड्यात गेल्या ३०-४० वर्षांत आमूलाग्र बदल झाला आहे. या गावगाड्याचा संवेदनशील धांडोळा म्हणजे 'अंतर्वेध'. त्यातून वाचकांनाही स्वतःच्या जीवनाविषयी अंतर्मुख होण्याची संधी मिळते," असे प्रतिपादन केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज केले.

माजी खासदार यशवंतराव गडाख यांच्या 'अंतर्वेध' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. जाधव यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी 'पानिपत'कार विश्वास पाटील होते. कार्यक्रमास पालकमंत्री बबनराव पाचपुते, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विठ्ठलराव लंघे, आमदार चंद्रशेखर घुले, आमदार जयंत पाटील, आमदार शंकरराव गडाख, शारदा गडाख, ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे, डॉ. द. ता. भोसले, वात्रटीकाकार रामदास फुटाणे, डॉ. सु. प्र. कुलकर्णी उपस्थित होते.

जाधव म्हणाले, "मनसुखसारख्या छोट्या व्यक्तीचे गडाख यांनी केलेले मनोभावी चित्रण, पुस्तक लिहिताना त्यांनी केलेले चिंतन, गावगाड्याबाबतचा त्यांचा गाढा अभ्यास, अनुभव यामुळे वाचक अंतर्मुख झाल्याशिवाय राहणार नाहीत. त्यांच्यातील संवेदनशीलता सध्याच्या समाजात कमी झालेली दिसते. आजच्या काळातील सर्व बदल वाईट आहेत, असे नाही. काही बदल चांगलेही आहेत. ते टिपण्याची ताकद हवी. ती गडाख यांच्यात आहे."

विश्वास पाटील म्हणाले, "सध्या कृषिसंस्कृतीवर घाला घातला जात आहे. जीवनात कोरडेपणा आला आहे. अशा स्थितीत संचित जपणे महत्त्वाचे आहे. ते पुढच्या पिढीपर्यंत पोचविण्याचे काम गडाख यांनी केले आहे."

पाचपुते म्हणाले, "पुढची पिढी घडविण्यासाठी पुस्तके उपयुक्त आहेत. गडाख यांच्या अनुभवाचा ठेवा पुढच्या पिढीला उपयुक्त आणि दिशादर्शक ठरणारा आहे." प्रास्ताविक डॉ. भोसले यांनी केले. या वेळी गडाख यांनी पुस्तक लिहिण्यामागील भावना व्यक्त केली. प्रा. सुभाष देवढे यांनी सूत्रसंचालन केले.

१३ एप्रिल २०१२



# दाते-गुणवंतांचा संगम

## डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रतिपादन

**म. टा. प्रतिनिधी ■ पुणे**

'परिस्थितीशी झगडत ध्येयपूर्तीसाठी झपाटून असंख्य व्यक्तींचा लढा सुरू आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून, समाजाच्या विविध स्तरांतून उभे राहिलेले, झगडून-संघर्ष करून पुढे येण्याचा प्रयत्न करणारे अनेक शिलेदार आहेत. त्यांना मदतीचा हात देण्यासाठी दाते आणि गुणवंतांचा संगम घडवून आणणे आवश्यक असते. म्हणूनच हेल्पलाइनचा उपक्रम मला स्तुत्य वाटतो', अशा शब्दांत प्रख्यात अर्थतज्ज्ञ व केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी 'मटा'च्या उपक्रमाचा गौरव केला.

'भारतात सध्या एक निःशब्द क्रांती सुरू आहे. अनेक समाजघटक, समाजातील विविध स्तर गावकुसाबाहेर ठेवण्यात आले होते किंवा आर्थिक स्थितीमुळे मुख्य प्रवाहापासून वेगळे पडले होते. त्या घटक-स्तरांमधील मुले-मुली आता जिद्दीने पुढे येऊन समाजामध्ये स्वतःचे स्थान निर्माण करीत आहेत. शिक्षण, हक्कांचे लढे उभारण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करणाऱ्या अशा मुला-मुलींना चालना देणारा असा हा हेल्पलाइनचा उपक्रम आहे', असे जाधव म्हणाले. 'दोन वर्षांपूर्वी या सोहळ्याचा साक्षीदार होण्याचे भाग्य लाभले. सर्व सुखसोयी, साधनसामग्री आणि पाठबळ मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या यशापेक्षा समाजातील अशा वंचित घटक-परिस्थितीमधील विद्यार्थ्यांच्या यशाचे मोल अधिक आहे. अशाच शिलेदारांना हेरून त्यांना मदतीचे पाठबळ 'मटा हेल्पलाइन' देते. त्यामुळेच सामाजिक-शैक्षणिक क्षेत्राबरोबरच राष्ट्रउभारणीच्या कार्यातही हेल्पलाइनचा मोठा वाटा आहे', असेही त्यांनी नमूद केले.

'समाजात विशेषतः महाराष्ट्रात, इतरांना मदत करण्याची इच्छा असलेले खूप जण आहेत. सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अजून खूप मोठ्या प्रमाणात शाबूत आहे. पण त्यांच्यापुढे मोठी समस्या आहे. आपली मदत योग्य व्यक्तीला, योग्य स्वरूपात, योग्य वेळी मिळेल, याची त्यांना खात्री नाही. म्हणूनच इच्छा असूनही हे दाते प्रत्यक्ष मदत करण्यासाठी 'धजावत' नाहीत. 'मटा हेल्पलाइन'ला मिळणारी मोठी मदत पाहून या शंकेलाही आता जागा राहिलेली नाही', असा विश्वास जाधव यांनी व्यक्त केला.

लोकमत २९ एप्रिल २०१२

# नवनवीन प्रवाहांमुळे मराठी भाषा समृद्ध

## 'अंतर्वेध' च्या प्रकाशनप्रसंगी विश्वास पाटील यांचे प्रतिपादन




ज्येष्ठ नेते यशवंतराव गडाख यांच्या 'अंतर्वेध' या पुस्तकाचे प्रकाशन करताना माजी कुलगुरू, अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव. समवेत डावीकडून आमदार चंद्रशेखर घुले, शारदा गडाख, लेखक यशवंतराव गडाख, पालकमंत्री बबनराव पाचपुते, 'पानीपत'कार विश्वास पाटील, प्रकाशक अरुण शेवते, ज्येष्ठ साहित्यिक द.ता.भोसले, जि.प. अध्यक्ष विठ्ठल लंघे.

**अहमदनगर** | दि. २८ (प्रतिनिधी)

**गडाखांच्या** साहित्याला मातीचा वास आहे. वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य येत आहे. असे साहित्याचे नवनवीन प्रवाह येत असल्याने मराठी भाषा मरेल कशी? असा सवाल पानिपतकार विश्वास पाटील यांनी करत मराठी भाषा इतकी लेचीपेची नाही, ती पॉवरफुल्ल आहे, असे सांगत मराठी भाषेच्या संकटावरील चर्चेला विराम दिला.

सोनई येथील मुळा पब्लिक स्कूलच्या प्रांगणात आज सायंकाळी माजी खासदार व साहित्यिक यशवंतराव गडाख यांनी लिहिलेल्या 'अंतर्वेध' या पुस्तकाचे प्रकाशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी पाटील बोलत होते. पुस्तकाचे प्रकाशन केंद्रीय नियोजन समितीचे सदस्य व अर्थतज्ज्ञ डॉ.नरेंद जाधव यांच्या हस्ते झाले. या कायक्रमास पालकमंत्री बबनराव पाचपुते, ज्येष्ठ साहित्यिक द.ता. भोसले, प्रसिद्ध वात्रटीकाकार रामदास फुटाणे,आमदार चंद्रशेखर घुले, आमदार शंकरराव गडाख,आमदार जयंत पाटील,जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विठ्ठलराव लंघे, महंत भास्करगिरी,सुनील गिरी, शिवाजी देशमुख महाराज, श्रीमती शारदा गडाख आदी मान्यवर उपस्थित होते.

मराठी भाषेबद्दलची चिंता अनाठायी असल्याचे स्पष्ट करीत ज्येष्ठ साहित्यिक पाटील म्हणाले, यशवंतराव गडाख यांनी अत्यंत मार्मिकपणे त्यांच्या जीवनात आलेल्या साध्या, कष्टाळू, निरागस व्यक्तिरेखा चितारल्या आहेत. पाखरे दाणे टिपतात तसे गडाखांनी गेल्या चाळीस-पन्नास वर्षापूर्वीचे जीवन टिपले आहे. हे लेखन म्हणजे कसदार साहित्यिकाचे चिन्हे आहेत . यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचा वारसा या यशवंतरावांनी चालविला आहे, असे सांगून गडाखांनी आता रानातील गीतांचे संशोधन लिखाण करावे, महिलांची गाणी साहित्यात आणण्याचे काम केले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

अर्थतज्ज्ञ नरेंद्र जाधव म्हणाले, गडाख हे सात्त्विक राजकारणी आहेत. त्यांच्याजवळ जिव्हाळा,अकृत्रिम अगत्यशीलता आहे. यशवंतराव चव्हाणांचा वारसा खऱ्या अर्थाने गडाखांनी चालविला आहे. नव्या बदलांना सरसकट वाईट म्हणणेही संयुक्तिक ठरणार नाही. काही नव्या गोष्टीही चांगल्या आहेत. काही जणांचे असणेही लोकांना दिलासा देणारे असते, तसे गडाखांचे आहे. त्यांनी आतापर्यंत तीन पुस्तके लिहिली आहेत, यापुढेही त्यांनी लिखाण चालूच ठेवावे अशी अपेक्षा जाधव यांनी व्यक्त केली.

प्रकाशक अरुण शेवते यांनी प्रास्ताविक केले. यावेळी लेखक यशवंतराव गडाख यांनी पुस्तक लेखनामागचा इतिहास कथन केला.

### विकत घेतली पुस्तके

मराठी भाषेचे फक्त कौतुक करून उपयोग नाही प्रत्यक्ष कृती केली पाहिजे असे सांगत कार्यक्रमात अर्थतज्ज्ञ नरेंद्र जाधव, साहित्यिक विश्वास पाटील यांनी रोख पैसे देत गडाखांच्या पुस्तकांची खरेदी केली.

### पाटील आता शब्दांच्या फडात!

आता बहुजन समाजातील माणसे लिखाण करू लागली याचा उल्लेख करताना विश्वास पाटील म्हणाले, पूर्वी पाटील म्हटले की, उसाचा फड आणि तमाशाचा फड आठवयाचा, परंतु आता पाटील म्हटले की शब्दाचा फड दिसू लागतो. हा बदल स्वागतार्ह आहे.